**वि.दि.मु. क्र. १/२०२२**
जिवराव वि. मनोज
**निशाणी क्र. ५४ लगत**

// ०३ //

**<u>प्रतिवादीचा साक्षीदार बळीराम डांगे यांचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. जगताप यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी माझे गाववाले आहेत. माझी जमीन लोहारा गावात असुन त्याचा गट क्र. १३१ असा आहे व त्याचे क्षेत्र साडे पाच एकर आहे. हे म्हणणे खरे आहे की, जिवराज चव्हाण यांचे गाव लव्हे, ता. माढा आहे. जिवराज सोबत जो सावकारकीचा व्यवहार झाला होता त्याची तारीख मला सांगता येणार नाही. जिवराज विरुध्द मी सावकारकीची तक्रार दिलेली नाही. जिवराज बरोबर झालेल्या व्यवहाराचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. मनोज यांच्या ट्रॉलीचा नंबर मला सांगता येणार नाही. युवराज चव्हाण हे लव्हे येथील आहेत.

२. हे म्हणणे खरे आहे की, जिवराज यांचा मुलगा विजय मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, विजय याचेसोबतचा व्यवहार हा खरेदीखताचा होता. जिवराज, विजय व माझ्यामध्ये दोन तीन व्यवहार झालेले होते त्याची तारीख मी सांगु शकत नाही. सदरच्या व्यवहाराचे लेखी टिपण केलेले नव्हते. मनोज यांचे पैसे माझ्या खरेदीच्या व्यवहारामध्ये वळवुन घेतले याबद्दल माझ्याकडे लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मनोज यांना मदत करण्यासाठी मी साक्ष देण्याकरीता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनोज यांच्या सांगण्यावरुन साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र देवून खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2025.11.24 17:10:00 +0530

दिनांकः २४.११.२०२५

**(आर. टी. इंगळे)**
सह दिवाणी न्यायालय व स्तर, परंडा.